# समोरच्या घरात

किताब मीनार वाचनालय
दे. भ. [illegible] परांजपे रस्ता, पुणे

नाटय/२४७६१/-

रत्नाकर मतकरी

RAMANATH PANDIT CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH IN INDIAN THEATRE
Date.........
ESTD. 1981

श्री विशाखा प्रकाशन, पुणे ४११ ०३०.

प्रकाशक :

राजा फडणीस
श्री विशाखा प्रकाशन
५८ शनवार पेठ, पुणे ३०.

१ ऑगस्ट

मुद्रक :

सौ. आशा प्र. बापट
स्मिता मुद्रणालय,
१२९८ शुक्रवार पेठ, पुणे २.

© सौ. प्रतिभा मतकरी, मुंबई १४.

प्रथमावृत्ति : १ जुलै १९७७

मुखपृष्ठ : रमेश भारताल

नाट्यपरीक्षण मंडळाचा मंजुरी क्रमांक :
DRM-IA-80 of 2-3-77.

प्रयोगासाठी सौ. प्रतिभा मतकरी, राधा निवास, टिळक रोड, दादर, मुंबई १४, यांची अनुमती घेणे आवश्यक आहे.

किताब मीनार वाचनालय
हे. भ. माळकर्ते शिवरामपंत परांजपे रस्ता, पुणे ९

दोन शब्द–

'समोरच्या घरात' हे नाटक 'नाइट वॉच' या इंग्रजी रहस्यमय नाटकावर आधारलेले आहे. मूळ इंग्रजी नाटकाचे मराठीकरण करताना मी त्यात अनेक बदल केले. दिग्दर्शक अरविंद ठक्कर यांनीही प्रयोगाच्या सोयीसाठी त्यात इतके बदल करून घेतले की 'नाइट वॉच'शी त्याचा संबंध नाममात्रच राहिला. मूळ नाटकापेक्षा ते काही ठिकाणी अधिक भरगच्चही झाले. बदलांचे श्रेय बहुतांशी श्री. ठक्कर यांचे. माझी या नाटकासंबंधीची भूमिका रंगभूमीसाठी एक रहस्यसंपन्न वस्तू निर्माण करणारा साहाय्यक, एवढीच.

–रत्नाकर मतकरी

"समोरच्या घरात" या नाटकाचा प्रथम प्रयोग रवींद्र नाट्यमंदिर येथे २६ मार्च १९७७ रोजी रात्री ८–३० वाजता करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| लेखक | : | रत्नाकर मतकरी |
| दिग्दर्शक | : | अरविंद ठक्कर |
| नेपथ्य–प्रकाशयोजना | : | बाबा पार्सेकर |
| पार्श्वसंगीत | : | सरोष भाभा |
| ध्वनि-संयोजक | : | जयंत सहस्रबुद्धे |
| प्रकाशयोजना साहाय्यक | : | चंद्रकांत शिंदे |
| रंगमंच व्यवस्था | : | जैमिनी मनोहर, अण्णा शिंदे |
| निर्मिति-व्यवस्था | : | पद्माकर आठवले |
| निर्मीती | : | भावना |
| सादरकर्ते | : | हरीष कुलकर्णी |

### भूमिका व कलावंत

| | | |
|---|---|---|
| अनुराधा | : | भावना |
| श्रीरंग विजयकर | : | अरुण सरनाईक |
| माधुरी | : | आशा पोतदार |
| कार्तिकेय | : | गणेश सोळंकी |
| इन्स्पेक्टर राजगुरू | : | मोहन सोळंकी |
| सबइन्स्पेक्टर सावंत | : | महेश धनशीकर |
| किसन | : | राघवेंद्र कडकोळ |
| डॉ. पंडित | : | जनार्दन सोहोनी |
| बहादूरखान | : | पुरुषोत्तम देसाई |

किताब मीनार वाचनालय
डे. म. ... रस्ता, पुणे २.
नाटक/२४८६१९/–

## अंक पहिला

( पहाटेचा सुमार...

चांदण्यात उजळून निघालेला एक शोभिवंत दिवाणखाना, कुलाब्यातील एका सुसज्ज घराचा.

खोलीत एकटीच बसलेली अनुराधा विजयकर. देखणी, बुद्धिमान पण किंचित विचलित. नजर शून्यपणे हातातल्या ग्लासवर लावलेली. डाव्या हातातील किल्ल्यांचा जुडगा खुळखुळवण्याचा निर्हेतुक चाळा. अंगात किंमती आकर्षक ड्रेसिंग गाऊन.

दूरवर पाचचे टोले पडतात...

अनुराधा खिडकीशी जाते. काही क्षण तशीच उभी राहते.

जिन्यातला दिवा लागतो. एक माणूस जिना उतरून येताना दिसतो. हा श्रीरंग विजयकर. देखणा, सुदृढ, काहीसा राकट. अंगात नाईट ड्रेस.

त्याची चाहूल लागताच अनुराधा दरवाजामागे जाऊन लपते. तो इकडे तिकडे पाहतो आणि 'अनुराधा– अनूऽ' अशा हाका मारतो. हाकेला उत्तर न मिळाल्यामुळे तो 'अनुराधा, तू किचनमधे आहेस का ?' असे विचारीत किचनच्या दिशेने जातो. तो गेल्याचे पाहताच ती लपलेल्या जागेतून बाहेर येते व दार धाडदिशी आपटते. दाराचा आवाज ऐकून तो पळतच वर येतो. 'कोण आहे ? कोण ते ?' असे ओरडतो. ड्रॉवरमधून रिव्हॉल्वर काढून इकडे तिकडे बघतो. एवढ्यात अनुराधा हसत हसत बाहेर येते.)

किताब मीनार वाचनालय

श्रीरंग : हे काय ? काय करीत होतीस तू ?

अनुराधा : मी ना ? मी पीत होते.

श्रीरंग : पण मग हाका मारल्या त्यांना ओ नाही दिलीस ?

अनुराधा : मी गंमत केली तुझी.

श्रीरंग : गंमत ? याला गंमत म्हणतात ? मला वाटलं कुणी चोरबीर आला की काय ?

अनुराधा : नशीब माझं तू माझ्यावर गोळी झाडली नाहीस.

श्रीरंग : आणि ही काय वेळ झाली गंमत करायची ? किती वाजलेत ठाऊक आहे का ?

अनुराधा : सॉरी श्रीरंग, माझ्यामुळं तुला जाग आली.

श्रीरंग : माझं काही नाही, पण तू अशी पहाटे उठून इथं येऊन बसलीस– पहाटे पाच वाजता...

अनुराधा : मला लवकर जाग आली.

श्रीरंग : इतक्या लवकर ? (ग्लासकडे लक्ष जाऊन) तू पीत होतीस ?

अनुराधा : मला माहितेय श्री, माझं पिणं तुला आवडत नाही.

श्रीरंग : तो प्रश्न नाही, पण रात्रीच्या वेळी जागून एकटीनं पीत बसणं... (एकदम लक्षात येऊन) माय गॉड, तू खोटं बोललीस अनुराधा. तू लवकर उठली नाहीस–

अनुराधा : मग ?

श्रीरंग : तू रात्रभर झोपलेलीच नाहीस. सारी रात्र तू दिवाणखान्यात काढलीस– व्हिस्की पीत.

अनुराधा : आय ॲम सॉरी श्री– पण मी – मी काय करू रे ? मला झोपच येत नाही. मग मी काही तरी करीत बसते... कोडी सोडवते, पुस्तक वाचते, नाही तर...

श्रीरंग : गेले सहा महिने असं चाललंय. आपण या जागेत आल्यापासून पाहतोय मी. एवढी सुंदर जागा घेतली. पाण्यासारखा पैसा ओतून आपण ती सजवली; पण तुला कशाचा काही आनंद नाही. दररोज संध्याकाळी तयारी करतेस, उंची कपडे घालतेस, पण



बाहेर सुद्धा पडत नाहीस. कधी डिनरला जाऊ, कॉन्सर्टला जाऊ म्हटलं तर नको म्हणतेस.

अनुराधा : मला नाही आवडत गर्दीत जायला.

श्रीरंग : आय ॲम टेरिबली वरीड अनू. अशानं तू आजारी पडशील, पाच वर्षांपूर्वी पडली होतीस तशी.

अनुराधा : नाही श्रीरंग, मी नाही पुन्हा पूर्वीसारखी आजारी पडणार. तो तात्पुरता शॉक होता. डॉक्टरच तसं म्हणाले होते. पुन्हा असं कधी होणार नाही.

श्रीरंग : (किंचित त्रासून) ओके, ओके, पुन्हा कधीच होणार नाही. पण म्हणून असं रात्रभर जागून त्याला आमंत्रण का द्यायचंय ?

अनुराधा : पण मला झोपच येत नाही. हा निद्रानाशाचा विकार आमच्या घराण्यातच आहे. आजोबांना तो होता, बाबासाहेबांनाही होता. आम्ही कुणाच्या जातीचे आहोत माहीत आहे ? घुबडाच्या ! आणि खरं सांगू श्री– दिवसेंदिवस मला रात्र आवडायला लागली आहे.

श्रीरंग : (अस्वस्थ. काही क्षणांनी) अनुराधा, तू काहीही म्हण, पण हे चांगलं लक्षण नाही. तुला झालंय तरी काय ? एकदा बोलून टाक.

अनुराधा : कुठं काय ? मी अगदी मजेत आहे.

श्रीरंग : खोटं बोलतेस. तुला कसली तरी काळजी पडलीय, म्हणून झोप उडालीय तुझी. कसली काळजी ? सांगून टाक.

अनुराधा : काही नाही म्हणते ना !

श्रीरंग : माझ्याविषयी काही आहे ? अलीकडे मला घरी यायला उशीर होतो म्हणून....

अनुराधा : चल, काही तरीच काय ?

श्रीरंग : मग ? माधुरीविषयी काही ?

अनुराधा : माधुरी ? तिचं काय ?

श्रीरंग : तसं काही नाही. पण दरवर्षी तिनं बंगलोरहून येऊन आपल्या-